पिंपळनेर महाविद्यालयाच्या मराठी भाषा विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी राजभाषा गौरव दिनाच्या निमित्ताने ऑनलाईन पध्दतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे व प्रमुख अतिथी प्रा. डॉ. तुषार चांदवडकर हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी करून दिला. तर आभार प्रा. एल. जी. गवळी यांनी मानलेत. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक / प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी बहुसंख्येने ऑनलाईन उपस्थित होते.

# माहितीपत्रक


कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव संलग्नीत
पिंपळनेर एज्यूकेशन सोसायटी संचलित, नॅक पुनर्मूल्यांकन 'ब' श्रेणी प्राप्त
कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासो एन. के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर, ता. साक्री. जि. धुळे (महाराष्ट्र)
यांच्या मराठी भाषा विभाग व विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस
'मराठी भाषा गौरव दिन' निमित्त व्याख्यान
प्रमुख वक्ते: मा. प्रा. डॉ. तुषार यतींद्र चांदवडकर
(कर्म. के. ह. आबड कला, श्रीमान मो. गि. लोढा वाणिज्य व श्रीमान पी. एच. जैन विज्ञान महाविद्यालय चांदवड, जि. नाशिक)
विषय: मराठी भाषा आणि महाकवि कुसुमाग्रज
व्याख्यान दि. : २७ फेब्रु. २०२१
वार : शनिवार
वेळ : सकाळी १०.०० वा.
स्थळ : झूम ॲप
प्रमुख उपस्थिती
मा. प्रा. डॉ. तुषार यतींद्र चांदवडकर (चांदवड महाविद्यालय)
प्रमुख वक्ते
मा. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे
कार्यक्रमाचे अध्यक्ष
संयोजन समिती
डॉ. संजय पांडुरंग खोडके
प्रा. एल. जे. गवळी
डॉ. सतीश श्रीराम मस्के

लोकमत

मराठी राजभाषा दिवस उत्साहात

# मराठी भाषेचे संवर्धन करणे, ही काळाची गरज!

लोकमत न्यूज नेटवर्क

धुळे : जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयांमध्ये कवी कुसुमाग्रज वि.वा. शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

**कर्म.आ.मा. पाटील महाविद्यालय**

पिंपळनेर- मराठी भाषेचे संवर्धन करणे, ही काळाची गरज आहे. हे आपले प्रत्येकाचे कर्तव्य आहे. त्यासाठी आपण सर्वजण कटिबद्ध होऊया, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.एस.टी सोनवणे यांनी केले.

पिंपळनेर येथील कर्म. आ.मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी राजभाषा गौरवदिनानिमित्त ऑनलाईन कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून चांदवड महाविद्यालयाचे प्रा.डॉ. तुषार चांदवडकर उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.डॉ. सतीश मस्के यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ. संजय खोडके यांनी करून दिला. आभार प्रा.एल.जी. गवळी यांनी मानले.

सकाळ

# पिंपळनेरला मराठी राजभाषा दिन

**पिंपळनेर, ता. १ :** कर्मवीर आ. मा. पाटील कला, वाणिज्य व (कै.) अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर येथील मराठी भाषा विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्यातर्फे मराठी राजभाषा गौरव दिन झाला. या ऑनलाइन कार्यक्रमात प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. चांदवड महाविद्यालयातील प्रा. डॉ. तुषार चांदवडकर प्रमुख वक्ते होते. ते म्हणाले, की कुसुमाग्रजांचे साहित्य मानवता निर्माण करणारे आहे. कुसुमाग्रजांचे मराठी भाषेच्या संवर्धनात मोलाचे योगदान आहे. त्यामुळे त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. प्रा. डॉ. सतीश म्हस्के यांनी सूत्रसंचालन केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी करून दिला. प्रा. एल. जी. गवळी यांनी आभार मानले.

# कुसुमाग्रजांचे साहित्य हे मानवता, बंधुता शिकविणारे साहित्य आहे : प्रा.डॉ.तुषार चांदवडकर यांचे विचार

**पिंपळनेर, दि.२८– (प्रतिनिधी): कुसुमाग्रजांचे साहित्य हे मानवता, बंधुता शिकविणारे साहित्य असून सर्वहारा वर्गांचे आहे. मानवी कल्याण साधणारे आहे असे प्रतिपादन प्रा. डॉ. तुषार चांदवडकर यांनी केले. ते कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर येथील मराठी भाषा विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी राजभाषा गौरव दिनाच्या निमित्ताने आयोजित ऑनलाईन कार्यक्रमात बोलत होते.**



याप्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे हे उपस्थित होते. प्रा. डॉ. चांदवडकर पुढे म्हणाले की, कुसुमाग्रजांनी माणसाचे साहित्य लिहिले. कुसुमाग्रजांचे साहित्य हे मानवता निर्माण करणारे आहे. जसे आचरणात तसे साहित्यातही त्यांनी उतरविले आहे. म्हणूनच त्यांच्या मृत्यूनंतरही रिक्षावाले ढसाढसा रडले. विद्रोही कवी नामदेव ढसाळ कुसुमाग्रज यांच्या मृत्यूनंतर म्हणतात की, आमचा बाप गेला. यावरून कुसुमाग्रज यांच्या लेखणीचे साहित्याचे महत्व दिसून येते. कुसुमाग्रजांचे मराठी भाषेच्या संवर्धनात खूप मोलाचे योगदान दिले आहे. त्यामुळे **(पान ४ वर)**

**पान १ वरून**

## कुसुमाग्रजांचे साहित्य हे मानवता, बंधुता शिकविणारे

त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला आहे. कुसुमाग्रजांच्या विविध (पाच पुतळे, कणा, गर्जा जय जय कार क्रांतीचा, साप आणि मुंगूस) कवितांचे, कादंबऱ्यांचे व नाटकांचे दाखले देऊन त्यातील मथितार्थ स्रोत्यांना समजावून सांगितला. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना प्राचार्य डॉ. एस. टी सोनवणे म्हणाले की, आपल्या माय भाषेचे संवर्धन करणे हे आपले प्रत्येकाचे कर्तव्य आहे. त्यासाठी आपण सर्वजण कटिबद्ध होऊ या. प्रत्येक व्यक्तीला आपल्या माय भाषेचा आदर असलाच पाहिजे. परंतु हल्ली सुशिक्षित मराठी भाषिक, मराठी भाषा बोलतांना काही इंग्रजी अथवा हिंदी शब्दांची सरळ मिसळ करतांना दिसतात. त्यामुळे मराठी भाषेचे मोल कमी झाल्यासारखे वाटते. प्रत्येकाला आपल्या भाषेबद्दल अभिमान वाटला पाहिजे तिचा स्वाभिमान बाळगा असे आवाहन ही त्यांनी विद्यार्थ्यांना केले. महाराष्ट्र ही जशी संतांची, विचारवंतांची, इतिहासकारांची भूमी आहे. त्याचप्रमाणे ती मराठी साहित्यकार तथा सारस्वतांची देखील भूमी आहे आणि त्यांचा गौरव करण्यासाठी आज आपण या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी करून दिला. तर आभार प्रा. एल. जी. गवळी यांनी मानलेत. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक/प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी बहुसंख्येने ऑनलाईन उपस्थित होते.

## पिंपळनेरला मराठी राजभाषा दिन

**पिंपळनेर, ता. १ :** कर्मवीर आ. मा. पाटील कला, वाणिज्य व (कै.) अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर येथील मराठी भाषा विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्यातर्फे मराठी राजभाषा गौरव दिन झाला. या ऑनलाइन कार्यक्रमात प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. चांदवड महाविद्यालयातील प्रा. डॉ. तुषार चांदवडकर प्रमुख वक्ते होते. ते म्हणाले, की कुसुमाग्रजांचे साहित्य मानवता निर्माण करणारे आहे. कुसुमाग्रजांचे मराठी भाषेच्या संवर्धनात मोलाचे योगदान आहे. त्यामुळे त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. प्रा. डॉ. सतीश म्हस्के यांनी सूत्रसंचालन केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी करून दिला. प्रा. एल. जी. गवळी यांनी आभार मानले.




## 13. विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

आज सर्वच क्षेत्रात स्त्रीया या पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. त्यामुळे पुरुषार्थ हा फक्त पुरुषांचा नसतो तर तो स्त्रियांचा देखील असतो. तसेच पुरुषार्थ कितीही मोठा असो परंतु त्याचा जन्म हा स्त्रीच्या कुशीतच होतो असे प्रतिपादन धुळे येथील प्रा. डॉ. उषा साळुंखे यांनी केले. त्या पिंपळनेर येथील कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर यांच्या विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित ऑनलाईन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उदघाटनप्रसंगी बोलत होत्या. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कॉलेज कमिटीचे चेअरमन श्री. धनराज राजमल जैन तर प्रमुख अतिथी म्हणून सि. गो. पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, पिंपळनेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे, परिक्षक म्हणून प्रा. डॉ. पौर्णिमा वानखेडे (धुळे) व श्री. भागवत सोनवणे (धुळे) हे उपस्थित होते.

प्रा. डॉ. उषा साळुंके पुढे म्हणाल्यात की, आजच्या या तंत्रज्ञानाच्या युगात तरुणींनी तंत्रज्ञानाचा उपयोग योग्य पद्धतीने केला पाहिजे. सौंदर्य हे दिसण्यात नसून आपल्या कलाकृतीत आहे. सौंदर्याचा अभिमान बाळगू नका आणि न्यूनगंड देखील बाळगू नका. आपले मत ठामपणे व्यक्त करायला शिका असे आवाहन देखील त्यांनी उपस्थितांना केले. प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे म्हणाले की, स्त्रियांचे सौंदर्य हे छोट्या छोट्या गोष्टीत अर्थात त्यांचे चालणे, बोलणे, वागणे यामध्ये असते. घरातील स्त्रियांचा सन्मान झाला पाहिजे. कुटुंबात त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे म्हणाले की, समाजामध्ये दोन प्रकारच्या स्त्रीया असतात. एक निमूटपणे सहन करणारी आणि दुसरी साहसी वृत्तीची. निमूटपणे सहन करणारी स्त्री जिथे आहे तिथेच आहे. परंतु साहसी स्त्री मात्र परिवर्तनवादी असते. आज टीव्हीवरील वेगवेगळ्या स्त्रीप्रधान मालिकांमुळे ग्रामीण भागातील स्त्रीयांमध्ये हळू-हळू बदल होताना दिसत आहेत. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना श्री. धनराज शेठ जैन म्हणाले की, महाविद्यालय अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबवित असते याचा मला विशेष आनंद आहे.

या स्पर्धेत एकूण २१ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. त्यातील१. प्रथम क्रमांक: रु. २१००/- रोख कु. चौधरी रूपाली कन्हैयालाल (कर्म. आ. मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर)२. द्वितीय क्रमांक: रु. १५००/- रोख कु. महाजन हिमानी विकास (डॉ. जी. डी. बेंडाळे महाविद्यालय, जळगाव)३. तृतीय क्रमांक: रु. १०००/- रोख गवळी निशा जानकीराम (सी. गो. पाटील महाविद्यालय, साक्री)हे विजेत्या पदाचे मानकरी ठरले आहेत. परिक्षकांच्या वतीने प्रा.डॉ. पौर्णिमा वानखेडे यांनी मनोगत व्यक्त केले. सर्व यशस्वी व स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन केले आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. सी. एन. घरटे यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय प्रा. पी. एम. सावळे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. वाय. एम. नांद्रे यांनी केले. या कार्यक्रमास पिंपळनेर, साक्री, दहिवेल, धुळे, बोराडी या महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, निवृत्त प्राध्यापक / प्राध्यपकेतर कर्मचारी आणि महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी ऑनलाईन जॉईन झाले होते.

# माहीतीपत्रक



कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव संलग्नीत
पिंपळनेर एज्यूकेशन सोसायटी संचालित, नॅक पुर्नमुल्यांकन 'ब' श्रेणी प्राप्त
कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासो एन. के. पाटील विज्ञान
वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर, ता. साक्री. जि. धुळे (महाराष्ट्र)
यांच्या विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
International Women's Day
जागतिक महिला दिन
निमित्त
राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा (State Level Elocution Competition)




कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी
उद्घाटक
मा. प्रा.डॉ. सौ. उषा साळूंखे
(सेवानिवृत्त प्राध्यापिका, कमलाबाई अजमेरा महाविद्यालय, धुळे)
प्रमुख अतिथी
मा. प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे
(सी. गो. पाटील महाविद्यालय, साक्री)
अध्यक्ष, संयोजन समिती
मा. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे
(पिंपळनेर महाविद्यालय)
कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा. श्री. धनराज राजमल जैन
(चेअरमन, कॉलेज कमिटी, पि. ए. सो.)

## स्पर्धेचे विषय:

- भारतीय महिला ... सशक्त महिला
- बेटी बचाव बेटी पढाओ
- महाराष्ट्रातील कर्तृत्ववान स्त्रियांच्या यशोगाथा
- स्त्री भ्रूण हत्या एक सामाजिक समस्या
- महिला अत्याचार एक जागतिक समस्या

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक २१०० रुपये | स्पर्धा: गुरू., दि. ११ मार्च २०२१ |
| द्वितीय पारितोषिक १५०० रुपये | वेळ : स. १०.३० वा. |
| तृतीय पारितोषिक १००० रुपये | स्थळ: झुम ॲप |

## स्पर्धेचे नियम

- स्पर्धा ऑनलाइन पद्धतीने झूम ॲप वर घेण्यात येईल. स्पर्धेचे माध्यम मराठी असेल.
- स्पर्धक विद्यार्थी-विद्यार्थिनी हा वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेशित असावा. त्यासाठी त्याने आय कार्ड ची फोटो कॉपी डॉ. एस. पी. खोडके यांच्या 9420374077 या व्हाट्सअप नंबर वर पाठवावे.
- स्पर्धेसाठी सात मिनिटांचा कालावधी दिला जाईल (६ + १).
- स्पर्धेसाठी सोबत पाठविलेली लिंक वर क्लिक करून नोंदणी करणे आवश्यक आहे.
- दि. १० मार्च (बुध.) २०२१, सायं. ५.०० वा. पर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानंतर स्पर्धकांना संधी दिली जाणार नाही.
- परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

**संयोजन समिती**

**प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे**

(अध्यक्ष, संयोजन समिती)

| प्रा. वाय. एम. नांद्रे | प्रा. पी. एम. सावळे | प्रा. सी. एन. घरटे | डॉ. एस. पी. खोडके |
|---|---|---|---|
| (सहा. कार्यक्रम अधिकारी) | (सहा. कार्यक्रम अधिकारी) | (रासेयो कार्यक्रम अधिकारी) | (विद्यार्थी विकास अधिकारी) |
| (9421536308) | (9421618258) | (7588910664) | (9420374077) |

**कार्यक्रमाची रूपरेषा: स्वागत**

प्रास्ताविक: प्रा. सी. एन. घरटे

अतिथींचा परिचय: प्रा. पी. एम. सावळे

मा. उदघाटकांचे मनोगत: प्रा. डॉ. सौ. उषा साळूंखे,
(सेवानिवृत्त प्राध्यापिका, कमलाबाई अजमेरा महाविद्यालय, धुळे)


मा.प्रमुख अतिथींचे मनोगत: मा. प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे,
(सी. गो. पाटील महाविद्यालय, साक्री)

मा. प्राचार्य यांचे मनोगत: मा. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे

मा. अध्यक्ष यांचे मनोगत: मा. श्री. धनराज राजमल जैन

स्पर्धेला प्रारंभ

आभार: प्रा. वाय. एम. नांद्रे, सुत्रसंचलन: डॉ. संजय खोडके






चौधरी उत्तर
विद्यापीठ, जळगाव
संलग्नीत
पिंपळनेर एज्युकेशन
संचलित
नॅक पुनर्मुल्यांकीत
पाटील कला,
कै. अण्णासाहेब
ता. साक्री जि. धुळे

# जागतिक महिला दिन निमित्त
# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा
## दि. ११/०३/२०२१ चा निकाल

**प्रथम क्रमांक**

**चौधरी रूपाली कन्हैयालाल**

(कर्म. आ. मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर)

**२१०० रुपये रोख बक्षिस**

**द्वितीय क्रमांक**

**महाजन हिमानी विकास**

(डॉ. जी. डी. बेंडाळे महाविद्यालय, जळगाव)

**१५०० रुपये रोख बक्षिस**

**तृतीय क्रमांक**

**गवळी निशा जानकीराम**

(सी. गो. पाटील महाविद्यालय, साक्री)

**१००० रुपये रोख बक्षिस**

# ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा

## प्रथम, व्दितीय तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचे पारितोषिक देत सन्मान

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

कुटुंबात स्त्रीयांशी संवाद झाला पाहिजे. घरात सन्मान झालाच पाहिजे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे यांनी केले. ते पिंपळनेर येथील कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य महाविद्यालयात ऑनलाईन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कॉलेज कमिटीचे चेअरमन धनराज जैन तर उद्घाटक प्रा. डॉ. उषा साळुंखे, प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे, परिक्षक प्रा. डॉ. पौर्णिमा वानखेडे, भागवत सोनवणे हे उपस्थित होते.

प्राचार्य अहिरे पुढे म्हणाले की, स्त्रियांचे सौंदर्य हे छोट्या छोट्या गोष्टीत अर्थात त्यांचे चालणे, बोलणे, वागणे यामध्ये असते. त्यांच्या अंगी नम्रता, सहनशीलता इ. गुण असतात. असेही ते म्हणाले. प्रा. डॉ. उषा साळुंके यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात जैन म्हणाले कि, महाविद्यालय अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबवित असते याचा मला विशेष आनंद आहे, असे सांगितले. या स्पर्धेत एकूण २१ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. त्यात प्रथम क्रमांक चौधरी रूपाली, द्वितीय महाजन हिमानी, तृतीय क्रमांक गवळी निशा यांनी पटकाविला. परिक्षकांच्या वतीने प्रा.डॉ. पौर्णिमा वानखेडे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. सी.एन.घरटे यांनी केले. परिचय प्रा. पी. एम. सावळे यांनी करून दिला. सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी तर आभार प्रा. वाय. एम. नांद्रे यांनी केले.

# 14. Department of Zoology Organized Online Workshop on ‘Indian Birds, Conservation and Bird Watching Techniques’

## Date : 24 March 2021



## प्रमुख उपस्थिती



मा. श्री. अनिल रतिलाल माळी (नाशिक)
पक्षीतज्ञ



मा. बाळासाहेब आर. एन. शिंदे
(प्रेसिडेंट, पि. ए. सो.)
प्रमुख अतिथी



मा. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे
कार्यक्रमाचे अध्यक्ष

## विशेष उपस्थिती

प्रो. डॉ. एस. एस. पाटोळे
(सी. गो. पाटील महाविद्यालय, साक्री)

प्रा. डॉ. एल. बी. पवार
(सी. गो. पाटील महाविद्यालय, साक्री)

डॉ. एस. डी. पगारे
(सटाणा महाविद्यालय, सटाणा)

प्रा. डॉ. जे. डी. वसाईत
(एम. एस. जी. कॉलेज, मालेगाव)

डॉ. एच. आय. शेख
(एन. एन. सी. महाविद्यालय, कुसुंबा)

प्रा. डी. एस. पाटील
(जी. टी. पी. महाविद्यालय, नंदूरबार)

## संयोजन समिती

डॉ. एस. पी. खोडके
(विद्यार्थी विकास अधिकारी)

प्रा. वाय. एम. नांद्रे
(योग शिक्षक)

प्रो. डॉ. आर. के. पेटारे
(समन्वयक, आय. क्यू. ए. सी.)

प्रो. डॉ. बी. सी. मोरे
(विभाग प्रमुख, प्राणीशास्त्र विभाग)

व्याख्यान
दि. २४ मार्च २०२१

वार: बुधवार
वेळ: स. ११.०० वा.

सहभागी होण्यासाठी खालील लिंक वर क्लिक करा.

https://us02web.zoom.us/j/87069390680?pwd=MDdsOUJ5OU1hNDYvWkRObDJNRGd2dz09

Meeting ID: 870 6939 0680
Passcode: 12345

कार्यक्रमाची रूपरेषा : स्वागत

प्रास्ताविक व परिचय : प्रो. डॉ. बी. सी. मोरे

अतिथींचे मनोगत
प्रमुख वक्ते: मा. श्री. अनिल रतिलाल माळी (नाशिक)

प्रमुख अतिथी : मा. बाळासाहेब आर. एन. शिंदे
(अध्यक्ष, पिंपळनेर एज्युकेशन सोसायटी)

अध्यक्षीय मनोगत: मा. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे

आभार: प्रा. वाय. एम. नांद्रे

सुत्रसंचलन: डॉ. एस. पी. खोडके

# 15 Health awareness (Online) : Fit India Movement

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, राष्ट्रीय सेवा योजना साक्री व विद्या विकास मंडळाचे सीताराम गोविंद पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात, साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विषय:-कोविड-१९ लसीकरण समज, गैरसमज व जागृती Time: May 13, 2021, 03:00 PM India नाशिक येथील नामांकित Dr Kishor Nandre (Regional Referral Hospital, Nashik, Special Experience in Civil Management) यांचे व्याख्यानात सहभाग**

https://youtu.be/OaZ0V-EiLDM

# 16. INTERNATIONAL YOGA DAY

## आंतरराष्ट्रीय योग दिन
## (दि. २१ जुन २०२१)

कोरोनाच्या या महाभयंकर कालावधीत योगाच्या माध्यमातून स्वत:चे स्वास्थ्य जपा असे आवाहन पिंपळनेर पोलिस स्टेशनचे पी.एस.आय. श्री. सचिन साळुंखे यांनी केले ते पिंपळनेर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना व विद्यार्थी विकास विभाग यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे, योग शिक्षक प्रा.वाय.एम. नांद्रे, श्री. सुभाष जगताप हे उपस्थित होते.श्री. साळुंखे पुढे म्हणाले की, कर्मचाऱ्यांसाठी योगा प्रशिक्षण कार्यक्रम महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आला ही आनंदाची बाब आहे. हा उपक्रम अतिशय वाखाणण्यासारखा आहे असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

योग शिक्षक वाय.एम. नांद्रे यांनी आयुष मंत्रालय निर्देशित विविध प्रकारची आसने व प्राणायाम यांचे प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांना दिले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सी. एन. घरटे व प्रा.पी.एम. सावळे हे प्रयत्नशील होते.
















देशदूत 22/6/21

# योगाच्या माध्यमातून स्वतःचे स्वास्थ जपा

## सपोनि सचिन साळुंखे यांचे प्रतिपादन; पिंपळनेर महाविद्यालयात कार्यक्रम

**पिंपळनेर । वार्ताहर**




कोरोनाच्या या महाभयंकर कालावधीत योगाच्या माध्यमातून स्वतःचे स्वास्थ्य जपा, असे आवाहन पिंपळनेर पोलिस ठाण्याचे सपोनि सचिन साळुंखे यांनी केले.

पिंपळनेर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना व विद्यार्थी विकास विभाग यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे, योग शिक्षक प्रा.वाय.एम. नांद्रे, जेष्ठ पत्रकार सुभाष जगताप हे उपस्थित होते. श्री.साळुंखे पुढे म्हणाले की, कर्मचाऱ्यांसाठी योगा प्रशिक्षण कार्यक्रम महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आला, हा उपक्रम अतिशय वाखाणण्यासारखा असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

यावेळी महाविद्यालयातील ज्येष्ठ प्रा. डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाठ लिखित जनरल केमिस्ट्री या संदर्भ ग्रंथाचे विमोचन देखील श्री. साळुंके व प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे, जेष्ठ पत्रकार सुभाष जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. के. डी. कदम यांच्या वॉक फोर सोसायटी या सामाजिक उपक्रमात देशभरातून सलग तीन वेळा द्वितीय क्रमांक व यावर्षी प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल त्यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. योग शिक्षक वाय. एम. नांद्रे यांनी आयुष मंत्रालय निर्देशित विविध प्रकारची आसने व प्राणायाम यांचे प्रशिक्षण दिले. सुत्रसंचलन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी केले. कार्यक्रमासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सी.एन. घरटे, प्रा. पी.एम. सावळे हे प्रयत्नशील होते.

### विद्यार्थीनीचा सत्कार

कार्यक्रमाचे औचित्य साधत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये तृतीय वर्ष पदार्थ विज्ञान शाखेतून संपूर्ण विद्यापीठातून सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली व दोन सुवर्णपदकांची मानकरी ठरलेली वैभवी अनिल शिंपी या विद्यार्थिनीचा सत्कार सपोनि साळुंके यांच्या हस्ते करण्यात आला.

सकाळ

# 'योगाच्या माध्यमातून स्वतःचे स्वास्थ्य जपा'

**सकाळ वृत्तसेवा**

**पिंपळनेर, ता. २१ :** कोरोना या महाभयंकर कालावधीत योगाच्या माध्यमातून स्वतःचे स्वास्थ्य जपा, असे आवाहन पिंपळनेर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन साळुंखे यांनी केले. ते पिंपळनेर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना व विद्यार्थी विकास विभाग यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे, योगशिक्षक प्रा. वाय. एम. नांद्रे, ज्येष्ठ पत्रकार सुभाष जगताप अध्यक्षस्थानी होते. या वेळी तृतीय वर्ष पदार्थ विज्ञान शाखेतून संपूर्ण विद्यापीठातून सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली व दोन सुवर्णपदकांची मानकरी ठरलेली वैभवी शिंपी या विद्यार्थिनीचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ प्रा. डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाठ लिखित 'जनरल केमिस्ट्री' या संदर्भ ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. प्रा. के. डी. कदम यांच्या 'वॉक फोर सोसायटी' या सामाजिक उपक्रमात देशभरातून सलग तीन वेळा द्वितीय क्रमांक व यंदा प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल त्यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी केले. कार्यक्रमासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सी. एन. घरटे व प्रा. पी. एम. सावळे हे प्रयत्नशील होते.



**पिंपळनेर : योग दिनप्रसंगी वैभवी शिंपी या विद्यार्थिनीचा सत्कार करताना सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन साळुंखे, प्राचार्य एस. टी. सोनवणे आदी.**

## रोटरी स्कूलमध्ये ऑनलाइन योग दिन

निमगूळ, ता. २१ : दोंडाईचा येथील श्रीमती मंदाकिनी टोणगावकर रोटरी इंग्लिश स्कूलमध्ये योग दिन ऑनलाइन पद्धतीने साजरा झाला. त्यात मुलांसह पालकांनीही सहभाग नोंदविला. शाळेचे अध्यक्ष हिमांशू शाह व प्राचार्य एम. पी. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रश्नमंजूषा स्पर्धा, विद्यार्थ्यांकडून योगासनांचा ऑनलाइन सराव असा कार्यक्रम राबविला. तसेच पालकांनीही पाल्यांसोबत योगासने करत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. क्रीडाशिक्षक अजय हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली योगासनाचे सादरीकरण केले. क्रीडाशिक्षक अजय हजारे यांनी योगामुळे व्यक्तिमत्त्व विकास व आध्यात्मिक शक्तीही वाढत असल्याचे सांगितले. डी. एम. पाटील व प्रशांत जाधव यांनी परिश्रम घेतले.



**दोंडाईचा : ऑनलाइन योगा करताना पालकांसह विद्यार्थी.**

**पिंपळनेर येथे योग दिन**

**पिंपळनेर :** आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधत भाजप पिंपळनेर मंडलाध्यक्ष मोहन सूर्यवंशी व महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रा. सविता पगारे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपळनेर, दहीवेल व आमखेल या तीनही ठिकाणी योग शिबिरांचे आयोजन केले होते. या वेळी योग प्रशिक्षक म्हणून पिंपळनेर येथे माधव पवार, दहीवेल येथे रवींद्र चौधरी, तर आमखेल येथे आर. टी. पवार उपस्थित होते. पिंपळनेर येथे मंडल सरचिटणीस प्रमोद गांगुर्डे, शहराध्यक्ष नितीन कोतकर, पंकज भावसार, उपाध्यक्ष प्रवीण देसले, रामलाल जगताप, सुनील माळी, ज्ञानेश्वर पवार, दत्तू बोरसे यांनी संयोजन केले.

Nashik, Dhule-Today
22/06/2021 Page No. 3



विद्यार्थिनीचा सत्कार करतांना सहायक पोलीस निरीक्षक सचिन साळुंखे. सोबत इतर पदाधिकारी

## योगाच्या माध्यमातून स्वतःचे स्वास्थ जपा - सचिन साळुंखे

पिंपळनेर - कोरोनाच्या या महाभयंकर कालावधीत योगाच्या माध्यमातून स्वतःचे स्वास्थ्य जपा असे आवाहन पिंपळनेर पोलिस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक सचिन साळुंखे यांनी केले.

पिंपळनेर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना व विद्यार्थी विकास विभाग यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे होते. यावेळी योग शिक्षक प्रा.वाय.एम. नांद्रे,पत्रकार. सुभाष जगताप हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे औचित्य साधत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये तृतीय वर्ष पदार्थ विज्ञान शाखेतून संपूर्ण विद्यापीठातून सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली व दोन सुवर्णपदकांची मानकरी ठरलेली वैभवी अनिल शिंपी या विद्यार्थिनीचा सत्कार स.पो.नि. सचिन साळुंके यांच्या हस्ते करण्यात आला. त्याच प्रमाणे प्रा. डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाठ लिखित जनरल केमिस्ट्री या संदर्भ ग्रंथाचे विमोचन देशील साळुंके व प्राचार्य डॉ.एस.टी. सोनव सुभाष जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. के. डी. कदम यांच्या वॉक फोर सोसायटी या सामाजिक उपक्रमात देशभरातून सलग तीन वेळा द्वितीय क्रमांक व या वर्षी प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल त्यांचा या प्रसंगी सत्कार करण्यात आला.

सुत्रसंचलन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सी. एन. घरटे व प्रा.पी.एम. सावळे हे प्रयत्नशील होते.

e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010

Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: Date: / /202

**1.3.1: Institution integrates crosscutting issues relevant to Professional Ethics, Gender, Human Values, Environment and Sustainability in transacting the Curriculum**

**Response:**

During academic year 2021-22 following activities were conducted relevant to Professional Ethics, Gender, Human Values, Environment and Sustainability in transacting the Curriculum

| Sr. No. | Name of the activity | Date of organization | Page No. |
|---|---|---|---|
| 01 | Death Anniversary of Lokmanya Tilak and Birth Anniversary of Annabhau Sathe (Online) | 01/08/2021 | 3 |
| 02 | International Day of Indigenous People (Online) | 09/08/2021 | 4-5 |
| 03 | Celebration of Independence Day | 15/08/2021 | 6 |
| 04 | Birth Anniversary of Poetess Bahinabai Chaudhary (Online) | 24/08/2021 | 7-9 |
| 05 | Online Workshop for Zoology Students on 'Artificial Bird Nesting And Conservation Techniques' (Online) | 26/08/2021 | 10-11 |
| 06 | Online Workshop for Zoology Students on 'Aquarium Preparation And Ornamental Fish Culture' (Online) | 27/08/2021 | 12 |
| 07 | India Freedom Run | 04/09/2021 | 13 |

Pimpalner Education Society's
# KARM. A. M. PATIL ARTS, COMMERCE AND KAI. ANNASAHEB N. K. PATIL SCIENCE SENIOR COLLEGE, PIMPALNER, TAL. SAKRI, DIST. DHULE.

e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010
Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: Date: / /202

Continue…

| Sr. No. | Name of the activity | Date of organization | Page No. |
|---|---|---|---|
| 08 | Vachan Cutta at Adopted Village Bopkhel | 24/09/2021 | 14 |
| 09 | Birth Anniversary of Mahatma Gandhiji & Lal Bahadur Shashriji (Online) | 02/10/2021 | 14 |
| 10 | Counseling Workshop for COVID Vaccination (Online) | 23/10/2021 | 15 |
| 11 | National Unity Day | 31/10/2021 | 16 |
| 12 | COVID Vaccination Camps | 25/10/2021 & 28/10/2021 | 17-19 |
| 13 | AIDS Awareness Program | 01/12/2021 | 20 |
| 14 | Participation In World Youth Day (Online) | 12/01/2022 | 21 |
| 15 | Marathi Bhasha Conservation Pandharwada (Online) | 21/01/2022 | 21-24 |
| 16 | Celebration of Republic Day | 26/01/2022 | 25 |
| 17 | Workshop on 'Suryanamskar' (Online) | 27 to 31 Jan.2022 | 25-26 |
| 18 | Celebration of Maharashtra Din & International Labor Day | 01/05/2022 | 27 |
| 19 | International Yoga Day | 21/06/2022 | 28 |

PES Karmvee A. M. Patil Arts, Commerce & Kai. Annasaheb N. K. Patil Sci. Sr. College Pimpalner Dhule

Pimpalner Education Society's

(NAAC Reaccredited 'B' Grade)

**KARM. A. M. PATIL ARTS, COMMERCE AND**

**KAI. ANNASAHEB N. K. PATIL SCIENCE SENIOR COLLEGE,**

**PIMPALNER, TAL. SAKRI, DIST. DHULE.**

e-mail: kamp_sr_college@yahoo.in | Web: http://www.kampsrcollege.org.in

Phone: 02561-223010 | Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: /202

# 1. Death Anniversary of Lokmanya Tilak and Birth Anniversary of Annabhau Sathe

**In association with Student Development Department and National Service Scheme Department in the college. The death anniversary of Lokmanya Tilak and the birth anniversary of democrat Annabhau Sathe were celebrated on 01 August 2021 in an Online mode on Zoom Platform.**

**The program was presided over by Principal Dr. S. T. Sonwane while Prof. P. M. Sawale was present as a chief guest. The program was coordinated by Student Development Officer Dr. Sanjay Khodke.**

## लोक शाहीर अण्णाभाऊ साठे आणि लो.टिळक यांनी आपल्या लेखणीतून निद्रीस्त समाजाला जगृत केले

पिंपळनेर (हरिष जगताप) : - लो. बाळ गंगाधर टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून आणि वाणीतून निद्रिस्त समाजाला जागृत केले असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे यांनी केले. ते पिंपळनेर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास



विभाग यांच्या संमुक्त विद्यमाने आयोजित लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त आयोजित ऑनलाईन कार्मक्रमात बोलत होते. प्रमुख वक्ते म्हणून रासेयो कार्मक्रम अधिकारी प्रा.पी.एम.सावळे उपस्थित होते.

प्राचार्म डॉ. सोनवणे पुढे म्हणाले की, लोकमान्य टिळक हे जहाल मतवादी विचार-सरणीचे, निडर, अन्यायाविरुद्ध

## पिंपळनेर महाविद्यालयात कार्यक्रम

**पिंपळनेर** : लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून आणि वाणीतून निद्रिस्त समाजाला जागृत केले असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांनी केले. ते पिंपळनेर महाविद्यालयाच्या रासेयो विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन कार्यक्रमात बोलत होते. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. पी. एम. सावळे उपस्थित होते. याप्रसंगी प्रा. एल. जे. गवळी यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा डॉ. संजय खोडके यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. सी. एन. घरटे, प्रा. वाय. एम. नांद्रे व प्रा. के. डी. कदम हे प्रयत्नशील होते.

https://studio.youtube.com/video/TH_PNJvGNy4/edit

सकाळ

## टिळक, अण्णा भाऊंनी समाजाला जागृत केले

### प्राचार्य डॉ. सोनवणे : पिंपळनेर महाविद्यालयात ऑनलाइन व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

पिंपळनेर, ता. ३ : लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून आणि वाणीतून निद्रिस्त समाजाला जागृत केले, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांनी केले.

पिंपळनेर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्याकडून टिळक पुण्यतिथी व साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाइन कार्यक्रमात ते बोलत होते. प्रमुख वक्ते म्हणून रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. पी. एम. सावळे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. सोनवणे म्हणाले की, टिळक हे जहालमतवादी विचारसरणीचे, निडर, अन्यायाविरुद्ध चिड असणारे व स्पष्ट वक्ते असे व्यक्तिमत्त्व होते. लोकशाहीर हे सुरवातीला कम्युनिस्ट विचारसरणीचे व नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव असणारे व्यक्तिमत्त्व होते. या दोन्ही महान विभूतींनी आपल्या लेखनातून आणि विचारातून निद्रिस्त समाजाला आपापल्या कालखंडात जागृत करण्याचे काम केले.

प्रमुख वक्ते प्रा. पी. एम. सावळे यांनी लोकमान्य टिळक व अण्णा भाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश झोत टाकला. याप्रसंगी प्रा. एल. जे. गवळी यांनीही मनोगत व्यक्त केले. दोन्ही विभूतींच्या प्रतिमांचे पूजन प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांच्या हस्ते झाले. सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी केले. कार्यक्रमासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सी. एन. घरटे, प्रा. वाय. एम. नांद्रे व प्रा. के. डी. कदम हे प्रयत्नशील होते.

Dhule, Dhule-Today
04/08/2021 Page No. 3

Pimpalner Education Society's

(NAAC Reaccredited 'B' Grade)

**KARM. A. M. PATIL ARTS, COMMERCE AND**

**KAI. ANNASAHEB N. K. PATIL SCIENCE SENIOR COLLEGE,**

**PIMPALNER, TAL. SAKRI, DIST. DHULE.**

e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010

Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

**Outward No:** **Date: / /202**

## 2. International Day of Indigenous People

**Our KAMP College and J. K. Shah Adarsh College, Nijampur were jointly organized a special program on International Day of Indigenous People. This program was celebrated in Online mode on 9th August, 2021.**

**The program was presided over by Principal Dr. A. P. Khirnar (J. K. Shah Adarsh College, Nijampur) while Prof. Mrs. Dr. Jayashri Gavit (V. W. S. College, Dhule) was the keynote speaker.** Prin. Dr. R. R. Ahire (S.G.Patil College, Sakri), Prin. Dr. S. T. Sonawane (Pimpalner), Prin. Dr. S. C. Ahire (Dahiwel College), Dr. Sachin Nandre (Director, NSS Dept. KBCNMU, Jalgaon), Dr. H. M. Shaikh (Dist. Coordinator), Prin. A. B. Marathe were the chief guest of this Online program.



Pimpalner Education Society's

(NAAC Reaccredited 'B' Grade)

# KARM. A. M. PATIL ARTS, COMMERCE AND
# KAI. ANNASAHEB N. K. PATIL SCIENCE SENIOR COLLEGE,
# PIMPALNER, TAL. SAKRI, DIST. DHULE.

e-mail: kamp_sr_college@yahoo.in | Web: http://www.kampsrcollege.org.in
Phone: 02561-223010 | Offg. Prin. K. D. Kadam

**Outward No:**








## आदिवासी बांधवांची जीवनशैली आदर्शव्रत प्राचार्य. डॉ.अे.पी.खैरनार यांचे प्रतिपादन

**पिंपळनेर, दि.१० (प्रतिनिधी) :- आदिवासी बांधव हे अतिदुर्गम भागात, दऱ्या-खोऱ्यात राहणारे, निसर्गाचे संरक्षक, भारतीय रुढी परंपरा जपणारे आणि आदर्श जीवनशैली असणारे देशाचे आदर्श नागरिक आहेत असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. अे. पी. खैरनार (निजामपूर महाविद्यालय) यांनी केले. ते क. ब. चौ. उ. म.वि., जळगाव अंतर्गत कर्म. आ. मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर आणि जे. के. शहा आदर्श महाविद्यालय, निजामपुर यांच्या विद्यार्थी विकास विभाग व रासेयो विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित *जागतिक आदिवासी दिनानिमित्त* आयोजित ऑनलाईन कार्यक्रमात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना बोलत होते.**

याप्रसंगी प्रमुख वक्त्या / मार्गदर्शक म्हणून विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे येथील प्रा. डॉ. जयश्री गावित उपस्थित होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे (पिंपळनेर), प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे (साक्री), प्राचार्य ए. बी. मराठे (पिंपळनेर), प्राचार्य डॉ. एस. सी. अहिरे (दहिवेल), प्रा. डॉ. हसीम शेख (जिल्हा समन्वयक, विद्यार्थी विकास विभाग) प्रा. डॉ. सचिन नांद्रे (जिल्हा समन्वयक, रासेयो, धुळे), प्रा. डॉ. डी. एस. चव्हाण (साक्री) हे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. खैरनार पुढे म्हणाले की, आदिवासी बांधवांमध्ये पुरोगामीत्व दिसते. स्त्री-पुरुष समानता आहे, हुंडा नवरा मुला कडून दिला जातो. सण-उत्सव एकत्रित व आनंदाने साजरा करतात. नैसर्गिक आहार घेतात, कष्ट करतात, त्यामुळे तंदुरुस्त राहतात असेही ते म्हणाले. प्रा. डॉ. जयश्री गावित म्हणाल्यात की, आदिवासी हे पहिले राष्ट्रवादी होत. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी खऱ्या अर्थाने सुरुवात त्यांनी केली. परंतु त्यांचा इतिहास चुकीचा मांडला गेला. त्यांचा विद्रोह हा केवळ जल, जंगल आणि जमीन यासाठी होता. म्हणून हा चुकीचा इतिहास पुसून या आदिवासी बांधवांची अस्मिता, त्यांचा सन्मान करण्याचा आजचा हा दिवस आहे असे त्यांनी अधोरेखित केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे (साक्री) यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सी. एन. घरटे यांनी केले तर प्रमुख अतिथींचा परिचय प्रा. के. एन. वसावे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी तर आभार सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. वाय. एम. नांद्रे यांनी मानलेत. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. पी. एम. सावळे प्रयतक्शील होते. या कार्यक्रमासाठी संस्थेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षक, दहिवेल, निजामपुर, पिंपळनेर, साक्री व म्हसदी या महाविद्यालयांतील सर्व प्राध्यापक/प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

**शब्दकोडे क्रम**



<u>आडवे शब्द :</u> १.पाणी ३.जीवनसाथी ५.संशय ७.रायगडावरील एक प्रसि
खान,ग्रेसी सिंह यांचा एक सिनेमा १८.कुस्तीगर २०.'हिरकणी बुरूज' अ
काळ २७.उंगली २८.महाबळेश्वर हे थंड हवेचे ठिकाण असलेला महार
कादंबरी ३३.नंतर ३५.अळी ३०.सोने ३७.भूप ३८.हिंदीत-सरोवर ३९.दमय
खाद्यपदार्थ '_ _ पाव' ४६.शह ४७.रेतीवर रेघोट्या ओढून भविष्य पाह
ते खाद्यपदार्थ ५०.जखम ५१.हार <u>उभे शब्द :</u> १.व्यवस्थित २.नगद
३.विदुषक ४.कलाकारास रसिकांकडून त्याने सादर केलेल्या क
मिळालेली पसंतीची पावती ५.सागरात शिंपल्यात आढळणारा एक
६.अपमान ८.मुस्लिम बांधवांचे रमजान महिन्यात येणारे
११.सामानाचे एकंदरीत आकारण्यात येणारी रक्कम १२.चिंतन १३.हिंदी
१४.अनिल कपूर, पूजा बत्रा, तब्बू यांचा एक सिनेमा १५.जेवणावळ १७.
१८.शर्यत १९.घटना २२.मोहरी घातलेले एक प्रकारचे तोंडी लावणे २३
अंशाचा कोन २६.डोंगर २८.मेहूणा २९.शाहरूख खान, जुही चावला
एकत्रित काम केलेला सिनेमा ३२.प्रियकर ३४.सध्या-उर्दूत ३५.चुरा ३
४१.घोळका ४३.'डाकर' ह्या शब्दांत रंगाचे नाव शोधा ४४.पाठीस आलेल
४८.वम-उलट लिहा

# 3. Celebration of Independence Day



**A flag hoisting program was organized on 15 August 2021 on the occasion of Golden Jubilee Year of Indian Independence. On this occasion, the flag was hoisted by Ms. Sharmila Pawar (Corona Warrior). Chief guest Shri. D. R. Jain (Chairman College Committee) was present on this occasion.**

सकाळ

## पिंपळनेर महाविद्यालयात ध्वजारोहण


**पिंपळनेर :** येथील कर्मवीर आ. मा. पाटील कला, वाणिज्य व (कै.) अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त कॉलेज कमिटीचे चेअरमन धनराज जैन यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे अध्यक्षस्थानी होते. कोरोनायोद्धा म्हणून यशस्वीपणे काम केलेल्या शर्मिला पवार यांचा सत्कार श्री. जैन यांच्या हस्ते झाला. एनसीसीच्या छात्र सैनिकांनी प्रमुख पाहुण्यांना मानवंदना देत पथसंचलन केले. विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी सूत्रसंचालन केले.

# 4. Birth Anniversary of Kavayitri Bahinabai Chaudhari

On August 24, 2021, an online lecture was organized on behalf of the college on the Birth Anniversary of Poetess Bahinabai Chaudhary.

The key speaker on the occasion was Prof. L. G. Sonwane (Ex. BOS Chairman, in Marathi, KBCNMU, Jagalon) while the chief guest Principal Dr. R. R. Ahire (S.G.Patil College, Sakri) was present. The program was presided over by the Principal of the college, Dr. S. T. Sonawane.

**https://studio.youtube.com/video/DaU2ULEiYe8/edit**






e-mail: kamp_sr_college@yahoo.in　　　Web: http://www.kampsrcollege.org.in

Phone: 02561-223010　　　Offg. Prin. K. D. Kadam


**Outward No:**　　　**Date:　　/　　/202**

# बहिणाबाईंचे काव्य हे जीवनाचा सार दर्शविते:अहिरे

**पिंपळनेर । प्रतिनिधी**



बहिणाबाईंना उत्स्फूर्तपणे स्फुरलेले काव्य हे मानवी जीवनाचा सार दर्शविते असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे यांनी केले. ते कर्म. आ. मा. पाटील व कै. अण्णासाहेब एन. के. पाटील महाविद्यालय, पिंपळनेर यांच्या विद्यार्थी विकास विभाग व रासेयो विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या जन्म दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना बोलत होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे तर प्रमुख वक्ते म्हणून सि. गो. पाटील महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा. एल. जी. सोनवणे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. अहिरे पुढे म्हणाले की, अशा या उपक्रमांमधून त्यांच्या साहित्याचा अमूल्य ठेवा पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचत असतो. या उपक्रमांमध्ये प्राध्यापक व विद्यार्थी यांनी हिरीरीने सहभागी झाले पाहिजे असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे म्हणाले की, बहिणाबाईंचे साहीत्य हे मानवी अंतरमनाचा ठाव घेणारे साहित्य होय. प्रमुख वक्ते प्रा.



**शासनाच्या हिंदु सणांच्या धोरणा विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या विद्यार्थी सेनेने दहिहंडी फोडा आंदोलन केले. या आंदोलनाने धुळेकरांचे लक्ष वेधून घेतले. या आंदोलनात विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष ॲड.प्रसाद देशमुख, गौरव गिते,यश शर्मा,हर्षल परदेशी,शुभम माळी, शामक दादाभाई,ओम कासार,सक्लेन शेख, योगराज पाटील,राहुल बागुल, गोपाल सोनवणे,प्रशांत व्यवहारे, राहुल मराठे,चेतन पाटील सहभागी झाले.राणाप्रताप चौकात लहान मुलाच्या हस्ते दहिहंडी फोडून शासनाचा निषेध मनसेने केला.**

# बहिणाबाईंच्या साहित्याची निर्मिती वेदनेच्या हुंकारातून : प्रा.सोनवणे

**पिंपळनेर, दि.२६ (प्रतिनिधी)- बहिणाबाई यांचे साहित्य हे वेदनेच्या हुंकारातून, त्यांनी अनुभवलेल्या यातनांमधून निर्माण झाले, असे प्रतिपादन प्रा.एल.जी. सोनवणे यांनी केले.**

कर्म.आ.मा. पाटील व कै.अण्णासाहेब एन.के. पाटील महाविद्यालय, पिंपळनेर यांच्या विद्यार्थी विकास विभाग व रासेयो विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या जन्म दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे होते तर अध्यक्षस्थानी सि.गो. पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर. अहिरे होते.

प्रा.सोनवणे पुढे म्हणाले की, बहिणाबाई यांनी सभोवतालच्या परिसरातील सूक्ष्म निरीक्षणातून, पंचमहाभूत यांच्या प्रकृतीतून आणि मानवी स्वभाव वैशिष्ट्ये यातून त्यांना साहित्य स्फुरले. त्यांचे मन काठोकाठ भरून जे ओसांडले तेच त्यांचे काव्य होय.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कवयित्री बहिणाबाई यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ.सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा.सी.एन घरटे यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय प्रा.वाय.एम. नांद्रे यांनी करून दिला. सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ.संजय खोडके यांनी केले तर आभार प्रा.पी.एम. सावळे यांनी मानलेत. ऑनलाईन संपन्न झालेल्या या कार्यक्रमास दहिवेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. सी. अहिरे, रासेयो जिल्हा समन्वयक प्रा.डॉ.सचिन नांद्रे त्याचप्रमाणे पिंपळनेर व साक्री महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ

# बहिणाबाईंचे काव्य जीवनाचा सार दर्शविते

## प्राचार्य डॉ. अहिरे : पिंपळनेरच्या पाटील महाविद्यालयाचा कार्यक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

पिंपळनेर, ता. २५ : बहिणाबाईंना उत्स्फूर्तपणे स्फुरलेले काव्य हे मानवी जीवनाचा सार दर्शविते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे यांनी केले.

कर्मवीर आ. मा. पाटील व (कै.) अण्णासाहेब एन. के. पाटील महाविद्यालय, पिंपळनेर यांच्या विद्यार्थी विकास विभाग व रासेयो विभाग यांच्याकडून आयोजित कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित ऑनलाइन कार्यक्रमात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे प्रमुख पाहुणे म्हणून होते. सि. गो. पाटील महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा. एल. जी. सोनवणे प्रमुख वक्ते म्हणून होते.



बहिणाबाई चौधरी

प्राचार्य डॉ. अहिरे म्हणाले, की अशा या उपक्रमांमधून त्यांच्या साहित्याचा अमूल्य ठेवा पुढच्या पिढ्यांपर्यंत पोचतो. या उपक्रमांमध्ये प्राध्यापक व विद्यार्थी यांनी हिरिरीने सहभागी झाले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. प्राचार्य डॉ. सोनवणे म्हणाले, की बहिणाबाईंचे साहित्य हे मानवी अंतर्मनाचा ठाव घेणारे साहित्य होय. प्रमुख वक्ते प्रा. एल. जी. सोनवणे म्हणाले, की बहिणाबाई यांनी सभोवतालच्या परिसरातील सूक्ष्म निरीक्षणातून, पंचमहाभूते यांच्या प्रकृतीतून आणि मानवी स्वभाव वैशिष्ट्ये यातून त्यांना साहित्य स्फुरले. कार्यक्रमाच्या सुरवातीला कवयित्री बहिणाबाई यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. सोनवणे यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रम अधिकारी प्रा. सी. एन. घरटे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. वाय. एम. नांद्रे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. पी. एम. सावळे यांनी आभार मानले. या ऑनलाइन कार्यक्रमास दहिवेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. सी. अहिरे, रासेयो जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. सचिन नांद्रे, पिंपळनेर व साक्री महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

पुण्य नगरी

# बहिणाबाईंचे साहित्य वेदनेच्या हुंकारातून फुलले- प्रा. सोनवणे

**पिंपळनेर** : बहिणाबाई यांचे साहित्य हे वेदनेच्या हुंकारातून, त्यांनी अनुभवलेल्या यातनातून निर्माण झाले आहे, असे प्रतिपादन प्रा. एल. जी. सोनवणे यांनी केले. ते कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या जन्म दिनानिमित्त कर्म.आ.मा.पाटील व कै.अण्णासाहेब एन.के.पाटील महाविद्यालयाचा विद्यार्थी विकास विभाग व रासेयो विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आयोजित कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सि. गो. पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे हे उपस्थित होते.



प्रा. एल. जी. सोनवणे पुढे म्हणाले की, बहिणाबाई यांना सभोवतालच्या परिसरातील सूक्ष्म निरीक्षणातून, पंचमहाभूत यांच्या प्रकृतीतून आणि मानवी स्वभाव वैशिष्ट्ये यातून त्यांना साहित्य स्फुरले. मन काठोकाठ भरून जे ओसांडले, तेच त्यांचे काव्य होय.

प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे म्हणाले की, बहिणाबाईंचे साहीत्य हे मानवी अंतरमनाचा ठाव घेणारे साहित्य होय.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे म्हणाले की, अशा उपक्रमांमध्ये प्राध्यापक व विद्यार्थी यांनी हिरीरीने सहभागी झाले पाहिजे. कवयित्री बहिणाबाई यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. सी. एन. घरटे यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय प्रा. वाय. एम. नांद्रे यांनी करून दिला. सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ.संजय खोडके यांनी केले. आभार प्रा. पी. एम. सावळे यांनी मानलेत. ऑनलाईन झालेल्या या कार्यक्रमास दहिवेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. सी. अहिरे, रासेयो जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. सचिन नांद्रे आदी उपस्थित होते.

Dulhe
Page No.2 August 26, 2021

# 5. Online Workshop for Zoology Students

Outward No. Date: / /202

**On 26 August, 2021 Online Workshop for Zoology Students on 'Artificial Bird Nesting And Conservation Techniques' was organized by Department of Zoology in association with IQAC & KCIIL. The workshop was presided over by Prin. Dr. S. T. Sonawane (Pimpalner) while Mr. Anil Mali (Ornithologist, Nasik) was the keynote speaker. Hon'ble Shri. R. N. Shinde (President, PES) was the chief guest of this Online program. 31 Participants were joined for this online workshop.**




https://studio.youtube.com/video/7vVdIiDnsqE/edit

# Online Workshop for Zoology Students

## पक्षांची होणारी घट पर्यावरणाच्या दृष्टीने घातक

**पिंपळनेर ।** सारस क्रेन सारखे विशाल पक्षी महाराष्ट्रात फक्त ६० एवढया संख्येने शिल्लक आहेत. पक्षांची सातत्याने कमी होणारी ही संख्या पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत घातक बाब आहे असे प्रतिपादन अनिल माळी यांनी केले. कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालय, यांच्या आयक्यूएसी केबीसीआयआयएलंतर्गत प्राणीशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित ऑनलाइन 'आर्टीफिशीअल बर्ड नेस्टींग अँड कॉनर्झवेशन टेकनिक' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे उपस्थित होते. अनिल माळी पुढे म्हणाले की, पक्ष्यांच्या संवर्धनासाठी नैसर्गिक कीटकनाशकांचा वापर केला पाहिजे. प्लास्टिकचा वापर टाळायला पाहिजे तसेच पक्ष्यांचा अधिवास वाचविला पाहिजे. दरम्याण, प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांनी देखील मार्गदर्शन केले. प्रास्ताविक विभाग प्रमुख प्रा. डॉ. बी. सी. मोरे, सूत्रसंचालन, आभार संयोजक प्रा. डॉ. संजय खोडके यांनी केले. यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. राम पेटारे, प्रा. वाय. एम. नांद्रे यांनी परिश्रम घेतले.

ऑन
कामे क
Passport New /
Renewal
Online Bank A/c
Open करून मिळेल.
संपर्क : 844

पुण्यनगरी २

## पक्षांची घटणारी संख्या पर्यावरणासाठी घातक बाब आहे - अनिल माळी

पिंपळनेर : सारस क्रेन सारखे विशाल पक्षी महाराष्ट्रात फक्त ६० एवढया संख्येने शिल्लक आहेत तर सापमान्या जातीचे पक्षी संपूर्ण भारतात फक्त दोन हजाराच्या संख्येने आहेत. पक्षांची सातत्याने कमी होणारी संख्या पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत घातक बाब आहे, असे प्रतिपादन अनिल माळी यांनी केले.

कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य व कै.अण्णासाहेब एन. के.पाटील विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर यांच्या आयक्यूएसी आणि केबीसीआयआयएल अंतर्गत प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित ऑनलाइन एक दिवशीय आर्टीफिशीअल बर्ड नेस्टींग अँड कॉन्झर्वेशन टेकनिक या विषयावरील कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे उपस्थित होते.

